# चल मोजूया

यशच्या पलंगासाठी चादर हवी : एक फार आखूड, एक फार लांब आहे.








यशकडे पलंगाचे माप मोजण्यासाठी टेप नाही. पलंगाचे माप वितीने मोजूया.





यशने पलंगाची लांबी ११ विती इतकी मोजली. त्यामुळे चादर १३ विती आणावी लागेल. कारण चादर थोडी मोठी लागते.

चर्चा करा : कोणत्या वस्तूंची लांबी मोजली जाते ?
लांबी मोजण्यासाठी कोणते साधन वापरावे ?

१) तुझ्या परिसरातील दोन कुंड्यांमधील अंतर पावलांनी मोज. ____ पावले.



२) वर्तमानपत्राची लांबी किती वीत असेल याचा अंदाज बांध. आता मोजून वर्तमानपत्राची लांबी किती वीत आहे ते लिही.
____ वीत.

